# वर्ग – एफ. वाय. बी. ए.

## प्रथम सत्र

विषय : मराठी साहित्य आणि भाषिक कौशल्य विकास

# मराठी कथेचे प्रकार

डॉ. महादेव कांबळे

## प्रास्ताविक :

मराठीच्या कथात्म साहित्याची मौखिक परंपरा गद्य आणि पद्य अशा दोन्ही माध्यमांत आढळते. कथानक, पात्र, वातावरण, निवेदन, भाषा ही कथेची सर्व वैशिष्ट्ये प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या कथेच्या सर्व प्रकारांत कमीजास्त प्रमाणात आढळून येतात. कथेच्या मौखिक परंपरेत कहाणी, लोककथा, परीकथा, नीतिकथा, दैवतकथा इत्यादी विविध प्रकारची रूपे होती. त्यातून आधुनिक कथा विकसित झाली परंतु आधुनिक कथेचे प्रयोजन मौखिक परंपरेतील रंजनवादी किंवा बोधपर कथेहून वेगळे आहे. आधुनिक काळातील मराठी कथेच्या वैविध्यपूर्ण रूपवैषिश्टयांमुळे कथेचे रचनाप्रकार, स्वरूप, विशय, आषय आणि प्रवाहानुसार विविध प्रकारांत वर्गीकरण केले जाते. अर्थात कथारूपांच्या या वैविध्याच्या मुळाषी एक‘कथात्व’च असते.

# मराठी कथेचे प्रकार व वर्गीकरण

## १ कथेचे रचनाप्रकार व स्वरूपानुसार वर्गीकरण

१. दीर्घकथा
२. लघुकथा
३. मालिका कथा
४. कथामाला
५. साखळी कथा

## २ कथेचे विशयानुसार वर्गीकरण:

१. ऐतिहासिक कथा
२. पौराणिक कथा
३. अद्भूतरम्य कथा
४. सामाजिक कथा
५. विज्ञान कथा

## ३ कथेचे आशयानुसार वर्गीकरण:

१. गूढकथा
२. भयकथा
३. रहस्यकथा
४. कौटुंबिक कथा
५. विनोदी कथा
६. नीतिकथा
७ बोधकथा

## ४ कथेचे प्रवाहानुसार वर्गीकरण

१. ग्रामीण कथा
२. दलित कथा
३. आदिवासी कथा
४. स्त्रीवादी कथा

## १) कथेचे रचनाप्रकार व स्वरूपानुसार वर्गीकरण -

बदलत्या काळात कथेचे रचना व स्वरूप बदलत गेल्याने तिचे दीर्घकथा, लघुकथा, मालिका कथा, कथामाला, साखळी कथा असे वर्गीकरण केले जाते.

### अ) दीर्घकथा:

दीर्घकथेतील जीवनदर्षन लघुकथेच्या तुलनेत अधिक सखोल असते. कथेच्या तुलनेत दीर्घकथेचा विस्तार व आवाका मोठा असतो. तिच्यातील अनुभवघटक अधिक असतात, तसेच त्यांच्यातील परस्परसंबंध अनेकविध असतात. तरीही ती प्रकृतीने कथाच असल्याने तिच्या संघटनेत कथेच्या जातीची एककेंद्रितता असते. उदा. मराठीत दीर्घकथा जी.ए.कुलकर्णी, कमल देसाई, गौरी देशपांडे यांनी लिहिली.

## ब) लघुकथा:

लघुकथेत घटना-प्रसंगांपेक्षा पात्रांचे मनोदर्षन, पात्रचित्रणामागील व कथानक निर्मितीमागील लेखकाचा विशिष्ट जीवनविषयक व कलाविषयक दृष्टीकोन याला महत्त्व असते. निश्चित स्वरूपाचा प्रारंभ, उत्कंठावर्धक कथन व चमत्कृतिपूर्ण शेवट अशी सुसंघटित रचना असते. एकात्म परिणाम हा लघुकथेचा महत्त्वाचा संस्कार असतो. लघुकथेमध्ये स्फुटकथा, रूपक कथा, अतिलघुकथा यांचा समावेष होतो.

स्फुट गोष्टी लिहिणा-या हरी नारायण आपटे यांच्या कथांनी आधुनिक मराठी कथेचा पाया घातला.

## क) मालिका कथा:

एकाहून अधिक कथा मिळून मालिका कथा आकाराला येते. तिच्यातील प्रत्येक कथेला स्वतःचे स्वतंत्र, स्वयंपूर्ण अस्तित्व असते; त्याचबरोबर मालिका कथेचा एक घटक म्हणूनही ती कार्यप्रवण असते. उदा. परेश कवडी, क. दि. सोनटक्के यांनी अशा मालिका कथा लिहिल्या आहेत.

## ड) कथामाला:

मालिका कथा म्हणजे कथामाला नव्हे. समान पात्र संच, वातावरण व भाववृत्ती असलेल्या कथांच्या समूहातून कथामाला आकाराला येते. उदा. चिं. वि. जोशी यांच्या चिमणरावाच्या कथा, गंगाधर गाडगीळांची बंडू-कथा इ. कथामालेतील प्रत्येक कथेला स्वतंत्र अस्तित्व असते. तशी ती स्वतंत्र कथा म्हणून आस्वादता येते. याशिवाय या कथांना परस्पर संदर्भाचे एक अधिकचे परिमाण असते. विनोदी कथांप्रमाणेच रहस्यकथा, गुप्तहेरकथा यांसारख्या प्रकारांतही कथामाला आढळतात.

## ड) साखळी कथा:

एकाहून अधिक कथांच्या बंधातून आकाराला येणारा साखळी कथा किंवा चौकडीची कथा (फ्रेम स्टोरी) हाही कथेचा उपप्रकार म्हणता येईल. एका कथेतून दुसरी व दुसरीतून तिसरी अशा पद्धतीने कथा आकाराला येते. व त्यांची गुंफण होणे, एका मुख्य कथेच्या चौकटीत अनेक उपकथांचा रचनाबंध निर्माण करणे, हे या कथारचनेचे तंत्र आहे. उदा. पंचतंत्र, अरेबियन नाइट्स इत्यादी.

2. कथेचे विशयानुसार वर्गीकरण:

कथेच्या अनुभवरूपांच्या अंगाने विषयानुसार वर्गीकरण करताना ऐतिहासिक कथा, पौराणिक कथा, अद्भूतरम्य कथा, सामाजिक कथा, विज्ञानकथा असे प्रकार मानले जातात.

3. कथेचे आशयानुसार वर्गीकरण:

कथेच्या आशयाच्या अनुषंगाने कथेचे गूढकथा, भयकथा, रहस्यकथा, कौटुंबिक कथा, विनोदी कथा, नीतिकथा आणि बोधकथा असे वर्गीकरण केले जाते.

४. कथेचे प्रवाहानुसार वर्गीकरण:

साठोत्तरी कालखंडात मराठी साहित्यात विविध साहित्यप्रवाह उदयाला आले. त्या त्या प्रवाहांचे तत्त्वज्ञान आणि स्वरूप-वैशिष्ट्यानुसार ग्रामीण कथा, दलित कथा, आदिवासी कथा आणि स्त्रीवादी कथा अशा कथा प्रकारांचा यात समावेश होतो.